शालेय शिक्षण व क्रीडा विभाग (खुद्द) च्या दालनांच्या नूतनीकरणाच्या स्थापत्य खर्चाची, पहिल्या टप्प्यातील रु.५२.८७ लक्ष इतकी रक्कम सार्वजनिक बांधकाम विभागास अदा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्र. नूतनीकरण-२०१७/प्र.क्र.१०/नोंदणी शाखा
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार) मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ०५ मार्च, २०१९.

<u>वाचा:-</u>

१. शासनाचा समक्रमांकाचा शासन निर्णय, दि.३० जून, २०१८ व शासननिर्णय क्र.नूतनीकरण-२०१७/प्र.क्र.१० भाग-१/नोंदणी शाखा, दि.३० जुलै, २०१८
२. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, अनुवि-४९१८/(४२/१८)/ अर्थसंकल्प, दि.०२ जुलै, २०१८
३. शासन परिपत्रक, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्रमांक-२०१७/प्र.क्र.११/नियोजन-३, दि.११.०४.२०१८
४. शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक-अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.०२.०४.२०१८
५. कार्यकारी अभियंता, दक्षिण विद्युत विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांचे पत्र जा.क्र./काअ/दमुंविवि/आस्था-१/६५९/२०१८, दि.०६.०३.२०१८
६. कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांचे पत्र क्र.इशवि/प्रशा/द/४५५०, दि.०९.०४.२०१८
७. कार्यकारी अभियंता, दक्षिण विद्युत विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांचे पत्र जा.क्र./काअ/दमुंविवि/स्विय/१७७१/२०१८, दि.०३.०५.२०१८
८. कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांचे पत्र क्र.इशवि/प्रशा/द/४५५०, दि.०९.०४.२०१८
९. कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांचे पत्र क्र.इशवि/प्रशा/द/१२८३, दि.२९.०१.२०१९

<u>प्रस्तावना :-</u>

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या मंत्रालयातील चौथ्या मजल्यावरील विस्तार इमारतीतील दालन क्र. ४१३, ४१५, ४१७,४१९, ४३२, ४३४, ४३६,४३८,४४० व ४४३ तसेच दालन क्र.४४६,४४७ व ४५९ विस्तार येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या बैठक रचनेचे नूतनीकरण करण्यासाठी स्थापत्य व वातानुकूलन यंत्रणेसाठी संदर्भ क्र.१ येथील दि.३० जून, २०१८ च्या शासननिर्णयान्वये रु.२,११,५१,२३६ (अक्षरी रुपये दोन कोटी अकरा लक्ष एकावन्न हजार दोनशे छत्तीस मात्र) तसेच उपरोक्त दालनांच्या विद्युतीकरणांसाठी दि.३० जुलै, २०१८ च्या शासननिर्णयान्वये रु.१६,१४,८८७/-

(अक्षरी रुपये सोळा लक्ष चौदा हजार आठशे सत्याऐंशी मात्र) अशा एकूण रु.२,२७,६६,१२३/- (अक्षरी रुपये दोन कोटी सत्तावीस लक्ष सहासष्ट हजार एकशे तेवीस मात्र) इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे या मंजूर रकमेतून पहिल्या टप्प्याकरिता रु.५२.८७ लक्ष (अक्षरी रुपये बावन्न लक्ष सत्याऐंशी हजार मात्र) इतक्या रकमेस संदर्भ क्र.२ येथील दि.२ जुलै, २०१८ च्या शासननिर्णयान्वये सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील शालेय शिक्षण व क्रीडा विभागासाठी अर्थसंकल्पित झालेला व वित्त विभागाकडून (BEMS) बीम्स प्रणालीवर प्राप्त झालेला निधी, विभागाच्या नियंत्रक अधिकाऱ्यांच्या अधीनस्त ठेवण्यासाठी मान्यता देण्यात आलेली आहे. सदर रु.५२.८७ लक्ष (अक्षरी रुपये बावन्न लक्ष सत्याऐंशी हजार मात्र) इतकी रक्कम सार्वजनिक बांधकाम विभागास अदा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या मंत्रालयातील चौथ्या मजल्यावरील विस्तार इमारतीतील दालन क्र. ४१३, ४१५, ४१७,४१९, ४३२, ४३४, ४३६,४३८,४४० व ४४३ तसेच दालन क्र.४४६,४४७ व ४५९ विस्तार येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या बैठक रचनेचे नूतनीकरण करण्यासाठी, स्थापत्य व वातानुकूलन यंत्रणेसह विद्युतीकरणाच्या कामाचे प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या रु.२,२७,६६,१२३/- (अक्षरी रुपये दोन कोटी सत्तावीस लक्ष सहासष्ट हजार एकशे तेवीस मात्र) या रकमेपैकी पहिल्या टप्प्याचे रु.५२.८७ लक्ष (अक्षरी रुपये बावन्न लक्ष सत्याऐंशी हजार मात्र) इतकी रक्कम सार्वजनिक बांधकाम विभागास स्थापत्य कामासाठी अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे. याकरिता विभागाच्या आहरण व संवितरण अधिकारी यांनी सदर रक्कम अर्थसंकल्पिय निधी वितरण प्रणालीव्दारे, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या आहरण व संवितरण अधिकारी, सांकेतांक क्र.७१०१९०३६९३ वर उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी.

२. सदर खर्च " मागणी क्रमांक ई-४, ४२०२, शिक्षण, क्रीडा, कला व संस्कृती यावरील भांडवली खर्च, (०१) सर्वसाधारण शिक्षण, २०२ माध्यमिक शिक्षण, (००) (०४), शिक्षण उपसंचालक व शिक्षण विभागाच्या कार्यालय इमारतीचे बांधकाम, ४२०२६२२८ " या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व विभागास मंजूर असलेल्या सन २०१८-२०१९ या वर्षाच्या आर्थिक तरतुदीमधून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र २०१९०३०५१७४५२५२१२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ravindra Pralhad Ate

Digitally signed by Ravindra Pralhad Ate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sport Departrment, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fd5fc4fce5f6732e6657dca817ae6ee619a55d170d3c93eff53c3ca69d1a772d, serialNumber=eaa37af2edb5809b000f33d26328f6cdac80ee32afdac3f68b5821d14e41dffa, cn=Ravindra Pralhad Ate
Date: 2019.03.05 17:47:32 +05'30'

(र.प्र.आटे)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
२) अप्पर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
३) प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
४) प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
५) सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
६) महालेखापाल, १ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई
७) महालेखापाल, १ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
८) अर्थसंकल्प कक्ष, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
९) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
१०) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
११) वित्त विभाग (व्यय-५/ व्यय-१४, अर्थसंकल्प-८) मंत्रालय, मुंबई.
१२) आहरण व संवितरण अधिकारी, लेखाशाखा, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१३) कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग (सा.बां.वि.) यांचे कार्यालय, बांधकाम भवन इमारत, मुंबई-४०० ००१
१४) कार्यकारी अभियंता, दक्षिण मुंबई विद्युत विभाग, (सा.बां.वि.) यांचे कार्यालय, बांधकाम भवन इमारत, मुंबई-४०० ००१
१५) सर्व कार्यासने, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१६) निवड नस्ती (नोंदणी शाखा).